# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:28.05.2026** **वारः गुरुवार**

---

1. सार्वजनिक वितरण व्यवस्था आधुनिक करण्यासाठी, 25 हजार 500 कोटी रुपयांहून अधिक खर्चासह 'सार्थक-PDS' योजनेच्या मुदतवाढीला केंद्राची मंजुरी.
2. राज्यातील ऊस आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांची केंद्र सरकारकडून दखल
3. नेमबाज ईशा सिंगचा 25 मीटर पिस्तुल प्रकारात नवा जागतिक विक्रम आणि
4. उष्णतेच्या लाटेबाबत पंतप्रधानांकडून खबरदारीचा इशारा

**<u>पीडीएस</u>**

सार्वजनिक शिधावाटपासाठी राज्यांना निधी देणारी सार्थक पीडीएस योजना 16व्या वित्त आयोगाच्या कालावधीत पुढे राबवण्याला केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत मंत्रिमंडळ बैठकीनंतर वार्ताहरांना ही माहिती दिली. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी 25 हजार 530 कोटी रुपयांची तरतूद करण्याचा प्रस्तावही या बैठकीत मंजूर झाला.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्यानं, सार्थक पीडीएस मधे 3 प्रणाली विकसित केल्या आहेत. लाभार्थ्यांची नोंदणी सांभाळण्यासाठी 'निर्मल', तर तक्रारींवर दाद मागण्यासाठी 'आशा' ही बहुभाषक प्रणाली तयार केली आहे. वितरण व्यवस्थेतल्या मालाची वाहतूक करणारे ट्रक किंवा इतर वाहनांची हालचाल, 'सक्षम' या प्रणालीत टिपली जाते. या योजनेअंतर्गत राज्यसरकारांना निधी देताना लागू होणाऱ्या नियमातही सुधारणा केली आहे असं वैष्णव म्हणाले.

**<u>ऊस-कांदा</u>**

साखरेच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करणं, इथेनॉल कोटा वाढवणे, कर्ज पुनर्गठन, व्याज सवलत, शेतकऱ्यांकडून थेट कांदा खरेदी, शेतीमालाचं ग्रेडिंग, कांदा बियाण्यांवर अधिभार आदी प्रश्नांबाबत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्यासोबत झालेल्या सकारात्मक चर्चेमुळे याबाबत लवकरच केंद्र सरकार अनुकूल निर्णय घेणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली.

नवी दिल्लीत महाराष्ट्रातील साखर कारखानदारी, ऊस आणि कांदा उत्पादक शेतकरी यांच्या विविध अडचणींसंदर्भात केंद्रीय सहकार मंत्री शाह यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित मंत्री आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींची चर्चा झाली. साखरेची किमान आधारभूत किंमत वाढवणं गरजेचं असल्याचं शाह यांनी मान्य केलं आहे. इथेनॉलचा कोटा मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी येत्या दोन महिन्यांत निर्णय घेण्याबाबत त्यांनी सहमती दर्शवली असून कर्ज पुनर्गठनासंदर्भात राज्य शासनासोबत एकत्रितपणे काम करून मार्ग काढण्याचं आश्वासन देण्यात आले आहे. व्याज सवलतीचे पैसे तात्काळ देण्याचं मान्य करण्यात आलं आहे.

नाफेड आणि एनसीसीएफनं सुरू केलेली कांदा खरेदी बाजारात थेट व्यापाऱ्यांकडून न होता, थेट शेतकऱ्यांकडून केली पाहिजे ही मागणी मान्य करण्यात आली आहे. सध्या कांद्याचं बियाणं मोठ्या प्रमाणात निर्यात होत असल्यानं देशांतर्गत कांद्याला निर्यात बाजारपेठ उरत नाही म्हणून कांदा बियाण्यावर मोठ्या प्रमाणात 'निर्यात अधिभार' लावला पाहिजे, ही मागणी देखील

मान्य करण्यात आली आहे. कांद्याच्या बियाणांवर निर्बंध असले, तरी कांद्याच्या निर्यातीवर कोणतीही बंदी नाही, असं या चर्चेत स्पष्ट करण्यात आलं.

**SIR**

SIR अर्थात मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणाच्या प्रक्रियेच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालयानं काल शिक्कामोर्तब केलं. जन प्रतिनिधीत्व कायदा 1950 च्या कलम 324 नुसार निवडणूक आयोगाला पुनरीक्षण प्रक्रिया राबवण्याचा अधिकार आहे, असं न्यायालयानं सांगितलं. इतर पुनरीक्षणापेक्षा SIR ची प्रक्रिया वेगळी आहे एवढ्याच कारणामुळं ते अवैध ठरत नाही असं सांगून SIR मुळे नागरिकत्व रद्द होतं हा याचिकाकर्त्यांचा दावा न्यायालयानं फेटाळून लावला.

**युसीसी**

आसाम विधानसभेनं 'समान नागरी संहिता विधेयक' काल मंजूर केल्यामुळं अशा प्रकारचा कायदा स्वीकारणारं आसाम हे ईशान्य भारतातील पहिलं आणि देशातील तिसरं राज्य ठरलं आहे. विवाह, घटस्फोट, वारसा हक्क आणि 'लिव्ह-इन' संबंधांशी निगडीत बाबींमध्ये, राज्यातील सर्व रहिवाशांसाठी एकच नागरी कायदेशीर चौकट प्रस्थापित करणं हा या कायद्याचा उद्देश आहे.

**ईद**

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी ईद अल-अधा म्हणजे बकरी ईदनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. ईद अल-अधा हा सण त्याग, करुणा आणि परोपकाराचा संदेश देतो. हा पवित्र सण सर्वांच्या जीवनात सुख, शांती आणि समृद्धी घेऊन येवो या शुभकामनेसह सर्वांना, विशेषतः मुस्लिम बंधू भगिनींना 'ईद मुबारक' च्या शुभेच्छा राज्यपालांनी आपल्या संदेशात दिल्या आहेत.

**योग दिन**

बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम 21 जूनला यंदा कोलकाता इथं होणार आहे. केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी काल खजुराहो इथं या दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ही माहिती देताना 'निरोगी वयोवृद्धीसाठी योग' ही यंदाच्या योगदिनाची संकल्पना असल्याचं सांगितलं. निरोगी आणि आजारमुक्त वृद्धत्वासाठी योगाभ्यासाला दैनंदिन जीवनाचा भाग बनवण्याचं आवाहन जाधव यांनी केलं. यावेळी योग पार्क उपक्रम, 'योग संगम' पोर्टल आणि योग दिवसानिमित्त नव्या टी-शर्ट डिझाइनचंही अनावरण करण्यात आलं.

**एनडीए**

पुण्यातील राष्ट्रीय संरक्षण अकादमीच्या 150 व्या अभ्यासक्रमाच्या दीक्षांत संचलन सोहळ्यानिमित्त उद्या 29 तारखेला 'सारंग' हेलिकॉप्टर पथकाकडून भव्य हवाई कसरती सादर करण्यात येणार आहेत. महिला कॅडेट्सच्या तिसऱ्या तुकडीच्या सहभागामुळं सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झालं आहे. स्वदेशी 'ध्रुव' हेलिकॉप्टरद्वारे आकर्षक समूह उड्डाण आणि कौशल्यपूर्ण हवाई प्रात्यक्षिकं सादर केली जाणार आहेत.

**जलसंपदा बैठक**

महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नवी दिल्ली इथं दिली. केंद्रीय जलसिंचन मंत्री सी. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत महाराष्ट्राकडून व्यक्त केलेल्या अपेक्षांना केंद्र सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला. राज्यातील 75 टक्केपेक्षा जास्त पूर्ण झालेल्या योजना, तसेच 50 ते 75 टक्केदरम्यान पूर्ण झालेल्या योजनांना प्राधान्यानं निधी दिला जाणार आहे.

**बालहक्क-रत्नागिरी**

वेगानं बदलणाऱ्या सामाजिक परिस्थितीत बालकांसमोरची आव्हानं अधिक गंभीर स्वरूपाची होत आहेत. म्हणूनच संवेदनशील, जबाबदार आणि सकारात्मक वातावरण समाजात निर्माण करण्याची गरज आहे, असं आवाहन महाराष्ट्र राज्य

बालहक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष ॲडवोकेट संजय पुराणिक यांनी काल रत्नागिरी इथं केलं. आयोगाच्या अर्ध न्यायिक सुनावणी आणि आढावा बैठकीत ते बोलत होते. प्रत्येक नागरिकाची सामाजिक बांधिलकी अधिक सक्षम होऊन बालस्नेही समाज निर्माण करण्यासाठी माध्यमं, समाजसेवी संस्था आणि प्रशासनानं पुढाकार घ्यावा, असंही बैठकीत सांगण्यात आलं.

**<u>खत</u>**

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय खत विक्री आराखड्यांतर्गत IFMS आणि Agristack प्रणाली एकत्र करण्यात आल्या आहेत. यासाठी FSAS हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून QR कोडद्वारे शेतकऱ्यांना खतांची ऑनलाइन नोंदणी करता येणार आहे. नोंदणीनंतर तीन दिवसांत निवडलेल्या विक्रेत्याकडून खत खरेदी करता येईल. त्यामुळं रांगा, अनावश्यक खतांची सक्ती आणि उपलब्धतेबाबतचा गोंधळ टळणार आहे. या पथदर्शी प्रकल्पाची सुरुवात खरीप हंगामात कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात होणार आहे.

**<u>नेहरू पुण्यतिथी</u>**

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना काल देशभरात आदरांजली वाहण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह मान्यवर नेत्यांनी पंडित नेहरू यांच्या आठवणींना उजाळा दिला. नवी दिल्लीत शांतिवन इथं पंडित नेहरूंच्या समाधीस्थळी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी तसंच इतर अनेक नेत्यांनी पुष्पांजली अर्पित केली.

**<u>नेमबाजी</u>**

भारतीय नेमबाज ईशा सिंगनं म्युनिक इथं सुरू असलेल्या ISSF विश्वचषक स्पर्धेतील महिलांच्या 25 मीटर पिस्तूल प्रकारात जागतिक विक्रम मोडला. 21 वर्षीय ईशानं अंतिम फेरीत 50 पैकी 43 गुण मिळवत, दक्षिण कोरियाच्या किम येजीच्या नावावर असलेला 42 गुणांचा मागील विक्रम मोडीत काढला आणि सुवर्णपदकावर आपलं नाव कोरलं.

**<u>हवामान</u>**

देशाच्या अनेक भागांत पसरलेल्या तीव्र उष्णतेच्या लाटेमुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. दिवस आणि रात्र या दोन्ही वेळी तापमान असामान्यरीत्या उच्च पातळीवर कायम आहे. पुढील दोन ते तीन दिवस तीव्र उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे; या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना सर्वतोपरी खबरदारी घेण्याचं आवाहन केलं आहे. शरीरातील पाण्याचं प्रमाण कायम राखण्याचा आणि घराबाहेर पडताना सोबत पाणी बाळगण्याचा सल्ला त्यांनी काल दिला. वृद्ध आई-वडील, आजी-आजोबा आणि प्रियजनांची नियमितपणे विचारपूस करावी, त्यांना पुरेसं पाणी पिण्याची, दुपारच्या कडक उन्हात घराबाहेर पडणं टाळण्याची आणि पुरेशी विश्रांती घेण्याची आठवण करून द्यावी, असं आवाहन त्यांनी लोकांना केलं आहे.

हिंगोली जिल्ह्यात काल संध्याकाळी गारपिटीसह पाऊस झाला. त्यामुळं आंब्यासह फळबागांचं नुकसान झालं.

विदर्भात उष्णतेची लाट कायम आहे. उत्तर कोकणातील तुरळक भागात उष्णतेची लाट येण्याची दाट शक्यता आहे. तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांसह वादळ, हलका ते मध्यम पाऊस आणि ताशी 40 ते 50 किलोमीटर वेगानं वारे वाहण्याची दाट शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.